ब्रेड, जॅम आणि फ्रान्सीस



लेखक: रसल होबन
चित्रे: लिलीयन होबन

ब्रेड, जॅम आणि फ्रान्सीस



मराठी अनुवादः सुशील मेन्सन



न्याहारीची वेळ होती.
सगळे न्याहारी करत होते.
वडील अंडे खात होते.
आई अंडे खात होती.
ग्लोरिया एका उंच खुर्चीवर बसली होती,
आणि तीसुद्धा अंडे खात होती.
फ्रान्सीस ब्रेड आणि जॅम खात होती.
“किती चविष्ट आहे हे अंड!” वडील म्हणाले.
“न्याहारीतला कुठला पदार्थ मला सर्वात आवडत असेल, तर तो आहे उकडलेलं मऊमऊ अंड.”
“खरंय,” छोट्या ग्लोरीयासाठी चमच्याने अंड उचलत आई म्हणाली.
“दिवसाची छान सुरुवात करण्यासाठी हा चांगला पदार्थ आहे.”
“हं!” म्हणत ग्लोरिया अंडे खाऊ लागली.
फ्रान्सीसने अंडे खाल्ले नाही.
ती अंड्याकडे पाहात एक गाणे म्हणू लागली.



ती हळू आवाजात गुणगुणू लागली:

मला नाही आवडत तुझं रूप गुळगुळीत ,
मला नाही आवडत तुझं आतलं बुळबुळीत,
मला नाही आवडत तुझं बरंच काही,
मला तुझी अजिबात गरज नाही,
मी नाही अंड खाणार बाई.



“काय बडबडतेयस, फ्रान्सीस?” वडिलांनी विचारले.

“काही नाही,” ब्रेडवर जॅम पसरवत फ्रान्सीस म्हणाली.

“तू सारखं ब्रेड आणि जॅमच का खात असतेस,” वडील म्हणाले. “एवढं छान उकडलेलं मऊ अंड समोर असताना?”

“मला ब्रेड आणि जॅम आवडतो, त्याचं एक कारण आहे,” फ्रान्सीस म्हणाली, “ते चमच्यातून विचित्रपणे घरंगळत खाली पडत नाही.”



“हो खरंय,” वडील म्हणाले, “न्याहारीला उकडलेलं अंड खायला प्रत्येकाला आवडेलच, असं नाही. पण अंड्याचे वेगवेगळे पदार्थ बनवता येतात. एका बाजूने शिजवलेलं आम्लेटसुद्धा रुचकर लागतं.”

“हो,” फ्रान्सीस म्हणाली. “पण अशा आम्लेटचं बलक आपल्याकडे विचित्र नजरेने बघत असतं. ते ताटात उलटं केलं तर आपल्या पोटावर झोपून वाट बघत बसलंय, असं वाटतं.”

“अंड्याची भुर्जी कशी वाटते?” वडील म्हणाले.

“भुर्जी काट्यातून निसटून खाली पडते,” फ्रान्सीस म्हणाली.



“चल, तुझ्या शाळेची वेळ झाली,” आई म्हणाली.

फ्रान्सीसने वह्या-पुस्तके, टिफिन आणि दोरीउड्या खेळण्याची दोरी घेतली.

मग आई-वडिलांचा पापा घेऊन, टाटा करून ती बसस्टॉपवर गेली.



बसची वाट बघताबघता ती दोरीउड्या खेळू लागली आणि गाऊ लागली:

बिस्किटावर जॅम, टोस्टवर जॅम
जॅम खायला मला आवडतं जाम
जॅम असतो चिकट, जॅम असतो गोड
जॅम असतो रुचकर, त्याला नाही तोड
रासबेरी, स्ट्रॉबेरी, गूसबेरी, मला तर
खूप....आवडतो....जॅम!

त्या दिवशी आईने रात्रीच्या जेवणासाठी ब्रेड आणि मटणाचे कटलेट बनवले. सोबत वाल तसेच भाजलेले बटाटेही होते.

“व्वा!” वडील म्हणाले. “ताटात ब्रेड आणि मटणाचं कटलेट! यापेक्षा स्वादिष्ट भोजन काय असू शकतं?”

“छान झालेयत ना?” आईने विचारले.

“वालसुद्धा खायचे ग्लोरिया.”

“बरं,” म्हणत ग्लोरीया वाल खाऊ लागली.

तिने आधीच मटण आणि रताळी खाल्ली होती. पण वाल पाहून तिला तेही खावेसे वाटले.



“ब्रेड आणि मटणापासून बनवलेले कटलेट कुठून येतात?” फ्रान्सीसने विचारले. “आणि वालाला *वाल* का म्हणतात?” “

“या विषयावर आपण नंतर कधीतरी बोलू,” वडील म्हणाले. “ही आपल्या जेवणाची वेळ आहे.”

फ्रान्सीसने तिच्या ताटाकडे पाहिले आणि ती गाऊ लागली.:

ब्रेडच्याआधी कटलेटच्या अंगावर काय होते ?
लोकरीचा झगा ? गुराख्याचे बूट ?
फरचे जाकीट? नाविकाचा सूट ?

मग ती ब्रेडला जॅम लावून खाऊ लागली.

“ती वेगळं काही खातच नाही,” आई वडिलांना म्हणाली. “फक्त ब्रेड आणि जॅमच खाते.”

“तू दुसरं काही खाल्लंच नाहीस, तर तुला कसं कळणार की ते तुला आवडतंय की नाही?” वडिलांनी विचारले.

“बरं,” फ्रान्सीस म्हणाली, “खाण्यासारखे बरेच पदार्थ आहेत, वेगवेगळ्या चवींचे. पण माझ्यासमोर ब्रेड आणि जॅम असतात, तेव्हा मला तेच खावंसं वाटतं आणि मला ते खायला मजा येते.”

“शाळेत मधल्या सुट्टीसाठी मी तुला वेगवेगळे पदार्थ देते,” आई म्हणाली. “आज मी तुला टिफिनमध्ये *चिकन सॅलॅड सँडवीच* दिलं होतं.”



“सांग बघू,” वडील फ्रान्सीसला म्हणाले. “ते चविष्ट नव्हतं का?”

“पण,” फ्रान्सीस म्हणाली, “मी ते अल्बर्टला दिलं.”

“आणि त्याबदल्यात तुला काय दिलं त्याने?” वडिलांनी विचारले.

“ब्रेड आणि जॅम,” फ्रान्सीस म्हणाली.





पुढल्या दिवशी सकाळी वडील न्याहारीला बसले. ते म्हणाले, “किती छान दिसतंय हे! ताज्या संत्र्यांचा रस आणि टोस्ट ब्रेडवर उकडलेलं अंड. ही तर अगदी पौष्टिक न्याहारी आहे!”

“धन्यवाद,” आई म्हणाली. “टोस्ट ब्रेडवर उकडलेलं अंड फार छान दिसेल, असं मला वाटलं.”

फ्रान्सीस उकडलेल्या अंड्याचे गाणे गाऊ लागली:

टोस्टवरच्या उकडलेल्या अंड्या, तुझं अंग किती कुडकुडतंय !
जणू काही तुझं हृदयच जोरात धडधडतंय !

मग तिने खाली पाहिले. तिला तिच्या टोस्टवर उकडलेले अंडे दिसले नाही.

“मला नाही दिलं उकडलेलं अंड,” फ्रान्सीस म्हणाली. “फक्त संत्र्याचा रसच दिलाय मला.”

“माहितीय मला,” आई म्हणाली.

“असं का केलंस?” फ्रान्सीसने विचारले. “सगळ्यांना उकडलेलं अंड मिळालंय. ग्लोरीयालासुद्धा मिळालंय, आणि ती तर किती छोटी आहे.”

“पण तुला तर अंड आवडत नाही,” आई म्हणाली. “म्हणून मी तुझ्यासाठी अंड उकडलं नाही. तुला भूक लागली असेल तर ब्रेड आणि जॅम खा.”

मग फ्रान्सीस ब्रेड आणि जॅम खाऊन शाळेत गेली.





मधली सुट्टी झाली.
फ्रान्सीस तिचा मित्र अल्बर्टसोबत बसली.
“आज काय आणलंयस टिफिनमध्ये?” फ्रान्सीसने विचारले.
“आज माझ्या डब्यात क्रीम, चीझ, काकडी आणि टोमॅटोचं सँडवीच आहे,” अल्बर्ट म्हणाला. “सोबत लोणचंसुद्धा आहे. आणि एक उकडलेलं अंड आणि मिरपूडची डबी. आणि दुधाने भरलेला थर्मास.

शिवाय, थोडी द्राक्ष, एक संत्र. आणि कपभर कस्टर्ड आणि हे सगळं खायला एक चमचा. तू काय आणलंयस?”
फ्रान्सीसने आपला डबा उघडला. “ब्रेड आणि जॅम,” ती म्हणाली. “आणि दूध.”
“तू नशीबवान आहेस,” अल्बर्ट म्हणाला. “तुझा आवडता पदार्थ आणलायस. आता आपल्याला टिफिन बदलायची गरज नाही.”

“खरंय,” फ्रान्सीस म्हणाली. “काल रात्री जेवणात मी ब्रेड आणि जॅम खाल्लं होतं आणि सकाळी न्याहारीलासुद्धा.”

“तू खरंच नशीबवान आहेस,” अल्बर्ट म्हणाला.

“होय,” फ्रान्सीस म्हणाली. “मलासुद्धा वाटतं, मी नशीबवान आहे. पण मी तुला माझा टिफिन देऊ शकते, तुला हवं असेल तर!”

“नको,” अल्बर्ट म्हणाला. “मला क्रीम, चीझ, काकडी आणि टोमॅटोचं सँडवीच आवडतं.”

अल्बर्टने दोन नॅपकिन घेतले. एक नॅपकिन त्याने आपल्या हनुवटीखाली खोचला. दुसरा नॅपकिन त्याने टेबलवर पसरवला. त्याने आपल्या टिफिनमधले पदार्थ त्यावर व्यवस्थित मांडले.

त्याने उकडलेल्या अंड्याचे कवच चमच्याने फोडले. मग कवच काढून तो अंडे खाऊ लागला.

त्याने अंड्यातील बलकावर मिरपूड टाकली आणि अंडे खाली ठेवले.

मग थर्मास उघडून त्याच्या कपात त्याने दूध ओतले.

आता त्याने भोजन घेण्यास सुरुवात केली..



त्याने थोडे सँडवीच, थोडे लोणचे, थोडे अंडे खाल्ले. तो थोडे दूध प्याला.

मग त्याने अंड्यावर आणखी थोडी मिरपूड टाकली आणि सगळे पदार्थ पुन्हा थोडेथोडे खाल्ले.

अल्बर्ट सँडवीच, लोणचे, अंडे मजेत खात होता आणि दूधही आनंदाने पीत होता.

त्याने द्राक्षे आणि संत्रसुद्धा खाल्ले.
मग त्याने टेबलवरून चुरगळलेला मेणकागद, अंड्याची टरफले आणि संत्र्याची साले हटवली.
त्याने कस्टर्डचा कप टेबलवरच्या नॅपकिनच्या मधोमध ठेवला.
आपला चमचा काढून त्याने सारे कस्टर्ड खाऊन टाकले.
मग अल्बर्टने आपल्या नॅपकिनची घडी केली आणि त्यांना बाजूला ठेवले.
त्याने मिरपुडची डबी आणि चमचाही बाजूला ठेवले.
त्याने थर्मास झाकण लावून बंद केले.
त्याने टिफिनचा डबा बंद करून टेबलच्या कप्प्यात ठेवला आणि एक दिर्घ उसासा टाकला.
“मला मनासारखं भोजन घ्यायला आवडतं,” अल्बर्ट म्हणाला.



फ्रान्सीस ब्रेड-जॅम खाऊन दूध प्याली.
मग ती मैदानात जाऊन दोरीउड्या खेळू लागली.
पण ती सकाळसारखी भरभर दोरीउड्या मारत नव्हती.
मग ती गाऊ लागली:

जॅम सकाळी, जॅम दुपारी,
ब्रेड आणि जॅम जेव्हा चंद्र डोक्यावरी,
छान....चविष्ट....लागतो.....जॅम.



फ्रान्सीस घरी परतली तेव्हा आई म्हणाली, “मला माहितीय शाळेतून परतल्यावर तुला थोडी न्याहारी करावीशी वाटते. मी न्याहारी तयार ठेवलीय तुझ्यासाठी.”

“मला न्याहारी खूप आवडते,” म्हणत फ्रान्सीस स्वयंपाकघरात पळाली.

“ही घे तुझी न्याहारी,” आई म्हणाली. “ग्लासभर दूध आणि छान ब्रेड-जॅम.”



“तुला माझी काही काळजीच वाटत नाही का? सारखं सारखं ब्रेड-जॅम खाऊन मी आजारी नाही का पडणार? माझे सगळे दात नाही का पडणार?” फ्रान्सीस तक्रारीच्या सुरात म्हणाली.

“मला नाही वाटत असं काही होईल,” आई म्हणाली. “चल, खाऊन टाक सगळं.”

फ्रान्सीसने बरेच ब्रेड-जॅम खाल्ले, पण सगळे नाही खाल्ले. न्याहारी केल्यावर ती बाहेर दोरीउड्या मारायला गेली.



दुपारी फ्रान्सीसने दोरीउड्या भरभर मारल्या. पण आता ती थोडे सावकाश खेळू लागली आणि सोबत गाऊ लागली:

जॅम खाऊ न्याहारीत, जॅम खाऊ जेवणात,
काय आहे जॅमच्या बरणीच्या मनात?
काठोकाठ....भरलेला....जॅम !

त्या रात्री आईने भोजनासाठी शेवया, मटणगोळे आणि टोमॅटो सॉस बनवले.

“छान! आपण दोनदोनदा हादडू शकतो, एवढं आहे खायला,” वडील म्हणाले. “कारण शेवया आणि मटणगोळे हे माझे आवडते पदार्थ आहेत.”





“शेवया आणि मटणगोळे तर सर्वांनाच आवडतात,” आई म्हणाली. “ग्लोरीया, थोड्या शेवयासुद्धा खा.”

“हो,” पुटपुटत ग्लोरीयाने शेवया तोंडात टाकल्या. फ्रान्सीसने तिच्या ताटाकडे पाहिले. त्यात शेवया आणि मटणगोळे नव्हते. त्यात फक्त ब्रेड आणि जॅमची बरणी होती. फ्रान्सीसला रडू फुटले.

“अरे बापरे!” आई म्हणाली. “फ्रान्सीस रडतेय चक्क!”

“काय झालं फ्रान्सीस?” वडील म्हणाले.

फ्रान्सीस तिच्या ताटाकडे बघत एक उदास कविता गाऊ लागली. ती एवढ्या हळू आवाजात गात होती की आईवडिलांना ते नीट ऐकूच आले नाही:

खरंच आता मला
जॅमचा वीट आला

“मला शेवया आणि मटणगोळे हवेत,” फ्रान्सीस म्हणाली. “मला द्याल थोडं, प्लीज?”

“मला नव्हतं माहीत, तुला शेवया आणि मटणगोळे आवडतात!” आई म्हणाली.



“तुला कसं कळणार मला हे आवडतं की नाही ते? तू मला कधी हे खायला तरी दिलं होतंस का?” डोळे पुसत फ्रान्सीसने विचारले. मग आईने फ्रान्सीसच्या ताटात शेवया आणि मटणगोळे वाढले. फ्रान्सीसने सगळ्याचा फडशा पाडला.





पुढल्या दिवशी शाळेत मधली सुट्टी झाली. अल्बर्टने फ्रान्सीसला विचारले, “आज काय आणलंस टिफिनमध्ये?”

“आज,” टेबलवर नक्षीदार रुमाल पसरत फ्रान्सीस म्हणाली. तिने रुमालावर एक छोटीशी फुलदाणी ठेवून त्यात जांभळी फुले लावली. “छान वाटतं आता,” म्हणत तिने रुमालावर टिफिनमधील पदार्थ मांडले.



“माझ्या थर्मासमध्ये टोमॅटो क्रिमचा रस्सा आहे,” फ्रान्सीस म्हणाली.
“आणि नरम पांढऱ्या ब्रेडवर झिंग्याची कोशिंबीर पसरून बनवलेलं सँडवीच आहे. माझ्याकडे सेलेरी, गाजर, काळे ऑलिव्ह आणि मिरपूडची डबी आहे. सोबत दोन आलुबुखार आणि छोट्याशा पिशवीत चेरी आहेत. शिवाय, चॉकलेटचा शिडकावा केलेलं व्हॅनिला पुडींग आणि ते खायला एक चमचा आहे.”
“हे तर खूप रुचकर भोजन आहे,” अल्बर्ट म्हणाला. “मला वाटतं, न्याहारीत, दुपारच्या आणि रात्रीच्या जेवणात वेगवेगळे पदार्थ खाणं बरं असतं.”
“मलासुद्धा असंच वाटतं,” फ्रान्सीस म्हणाली.
मग तिने झिंगा-कोशिंबीर सँडवीच, सेलेरी, गाजर आणि काळे ओलिव्ह मजेत खाल्ले.



बघा! फ्रान्सीसकडे जॅमची मोठी बरणी आहे.

आणि ब्रेडसुद्धा आहे.

फ्रान्सीस म्हणते, तिला ब्रेड-जॅम खूप आवडतो.

मग ती का रडतेय?